महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवटदारांच्या झाडांची विक्री करणे(नियमन) अधिनियम, 1969 अन्वये अनुसूचित जमातीच्या भोगवटदारांच्या झाडांची विक्री करून प्राप्त झालेली रक्कम जमा करणे/अदा करणेबाबत.

वित्तीय अधिकार प्रदान करणे.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक: एफएलडी 3691/प्र.क्र.432/फ-3,
मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 5 ऑक्टोबर, 1995.

पहा :- (1) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक:एफएफडी 1076/2643/फ-3, दिनांक 23 एप्रिल, 1976.

(2) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक: एफएलडी-3691/प्र.क्र.432/फ-3, दिनांक 18 मार्च, 1992.

**परिपत्रक :-** महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवटदारांच्या झाडांची विक्री करणे (नियमन) अधिनियम, 1969 मधील तरतुदी नुसार अनुसूचित जमातीच्या खातेदारांच्या झाडांची विक्री करण्यात येते. सदर खातेदारांना त्यांच्या मालाची रक्कम अदा करण्याबाबत शासन परिपत्रक, क्रमांक: टिआरएस-1081/120163/एफ-3, दिनांक 22 जुलै, 1962 अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रकातील तरतुदी नुसार अनुसूचित जमातीच्या खातेदारांच्या झाडांच्या विक्रीची रक्कम त्यांना अदा करण्यात येते त्यांना अदा करावयाची रक्कम अदा करण्यासाठी व त्यांच्या मालाची प्राप्त झालेली विक्रीची रक्कम जमा करण्यासाठी कार्यवाही करण्याकरिता शासन परिपत्रक,क्र.एफएलडी 3691/प्र.क्र.432/फ-3, दिनांक 18 मार्च, 1992 अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. अनुसूचित जमातीच्या खातेदारांना अदा करावयाच्या रकमा महसूली खर्चाच्या लेखाशिर्षाखालील तरतुदीमधून अदा करण्यात येत असल्याने शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक: एफएफडी 1076/2643/एफ-3, दिनांक 23 एप्रिल,1976 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मुख्य वनसंरक्षक यांना रुपये 15,000/- पर्यंत, वनसंरक्षक यांना रु.10,000/- पर्यंत व उप वनसंरक्षक/उप विभागीय वन अधिकारी (उप विभागाचा स्वतंत्र कार्यभार असलेले) यांना रुपये 2,000/- पर्यंत अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. अनुसूचित जमातीच्या खातेदारांची रक्कम अदा करण्यासाठी सुध्दा हया आर्थिकमर्यादेच अधिकार असल्याने अनुसूचित जमातीच्या खातेदारांच्या रकमा अदा करण्यासाठी विलंब होत होता म्हणून अनुसूचित जमातीच्या भोगवटदारांच्या झाडांच्या विक्रीच्या रकमा अदा करण्यासाठी खालीलप्रमाणे वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येत आहेत :-

| | | |
|---|---|---|
| (1) | मुख्य वनसंरक्षक | रुपये 2,00,000/- पर्यंत |
| (2) | वनसंरक्षक | रुपये 1,00,000/- पर्यंत |
| (3) | उपवनसंरक्षक | रुपये 50,000/- पर्यंत |
| (4) | सहायक वनसंरक्षक<br>उपविभागीय वन अधिकारी | रुपये 25,000/- पर्यंत |
| (5) | वन परिक्षेत्र अधिकारी | रुपये 15,000/- पर्यंत |

2. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक: टीआरएस 1287/सीआर 436/फ-3,दिनांक 11 ऑक्टोबर, 1988 अन्वये देण्यात आलेले आदेश शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक: एफएलडी 3691/प्र.क्र.432/फ-3, दिनांक 18 मार्च, 1992 येथे निर्गमित आदेशान्वये रद्द झालेले आहेत. तरी आपण अनुसूचित जमातीच्या

शा.म.मु.राज/एक-1050(1500-10-95) (पु.पा.प.)

आदिवासींच्या झाडांच्या विक्रीपासून जमा होणारी रक्कम आणि अनुसूचित जमातीच्या खातेदारांना अदा करण्याकरिता विहित करण्यात आलेली महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: एफएलडी 3691/प्र.क्र.432/फ-3, दिनांक 16 मार्च, 1992 मध्ये विहित केलेल्या सुधारित कार्यपद्धतीचे पालन करून कार्यवाही करण्यात यावी.

3. अनुसूचित जमातीच्या खातेदारांच्या झाडांच्या विक्रीच्या रकमा अदा करण्यासाठी उपरोक्त परिच्छेद 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे वन अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेले विशेष अधिकार प्रत्येक खातेदाराच्या अर्जाप्रमाणे विक्री करण्यात येणाऱ्या झाडांच्या एकूण किंमतीच्या संदर्भातील आहेत. ही बाब विचारात घेऊन अनुसूचित जमातीच्या खातेदारांना झाडांच्या किंमतीच्या संदर्भातील रकमा अदा करण्यासाठी प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा योग्य वापर करून तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

4. हे परिपत्रक, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: 396/95 विनियम, दिनांक 18 ऑगस्ट, 1995 अन्वये त्यांच्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(गो. डो. तायडे,)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

(1) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
(2) मुख्य वनसंरक्षक (संरक्षण/मूल्यांकन व राष्ट्रीयीकरण/उत्पादन/वन्यजीव/व्याघ्र प्रकल्प), प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालय, नागपूर,
(3) सर्व वनसंरक्षक, प्रादेशिक (प्रत्येकी 10 प्रती),
(4) सर्व उप वनसंरक्षक (प्रत्येकी 20 प्रती),
(5) सर्व उप विभागीय वन अधिकारी, द्वारा: उप वनसंरक्षक,
(6) सहाय्यक वनसंरक्षक/उप विभागीय वन अधिकारी/वन परिक्षेत्र अधिकारी, द्वारा उप वनसंरक्षक,
(7) सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग,
(8) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-400 032,
(9) वित्त विभाग, व्यय-4/विनियम/व्यय-10, मंत्रालय, मुंबई-400 032,
(10) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-1, मुंबई,
(11) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-1, मुंबई,
(12) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-2, नागपूर,
(13) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-2, नागपूर,
(14) निवडनस्ती, फ-3 कार्यासन, महसूल व वन विभाग.

---

मशाप्र-1059(1500)10-95)-3.